प्रकरण - ८

# उ द र

## - साध्यासाध्य विचार -

### [ उपद्रव रिष्ट सहित: ]

आयुर्वेदाने अलोदराचा रोगी कृच्छ्रसाध्य वा असाध्य ठरविला आहे. [जन्मनैवोदरं सर्वम् प्राय: कृच्छ्रतमं मतम् ] स्वभावत:च दुश्चिकित्स्य असे जे ८ रोग [ महारोग ] मानले आहेत त्यामध्ये उदराचा उल्लेख आहे. अशा-त-हेने तीन गोष्टींनी असाध्यत्व प्राप्त होते.

[१] लिंगासाध्य [२] उपद्रवासाध्य व [३] रिष्टसाध्य..

" त्रिप्रकारा व्याधीनां असाध्यता लिंगविशेषाभ्योगात्, उपद्रवविशेषायोगात रिष्टविशेषायोगोच्च । ... सु.सू. ३३ ४-५ चक्रपाणी.

रोग जलद वाढत जाऊन त्यांची लक्षणे तीव्र प्रकारची असणे. उदा. पित्तोदरामध्ये मूर्च्छा, अतिसार, ज्वर वगैरे लक्षणे तीव्र स्वरूप धारण करुन असाध्यतेप्रत जाणे.

कांही वेळा ज्या लक्षणांचा कार्यकारणभाव समजत नाही अशी लक्षणे निर्माण होतात. उदा.

" अतिमात्रं लघूनि स्युर्गात्राणि गुरूणि वा
यस्या कस्मात्सविशेषो गंता वैवस्वतालयम् । सु.सू. ३१.

काही कारण नसतांना ज्यांचे शरीरम एकदम जड किंवा हलके होते तो जगणार नाही असे समजावे.

उपद्रवैस्तु यः जुष्टा व्याधायो यान्तवार्यताम् ।
रसायनाद्विना वत्स ... । सु.सू. ३३

उपद्रवयुक्त कष्टसाध्य विकारहि चिकित्सेने बरे होतात असे म्हटले आहे. उपद्रव म्हणजे - " उपद्रवस्तु रोगोत्तरकालज: रोगाश्रय: रोग एव स्थूलो ऽणुर्वा, रोगपश्चेत् जायते इति उपद्रव: । रोगारंभक दोषप्रकोपजन्य: अन्य: विकार: उपद्रव हा रोग उत्पन्न झाल्यानंतरच्या कालांत निर्माण होणारा प्रथमोत्पन्न रोगाच्या आश्रयानें असणारा दुसरा एक रोगच आहे. परतंत्रातेमुळे मूळचा व्याधि प्रशम पावला कीं, उपद्रवाचाहि शम होतो. तरीहि उपद्रव बलवान असल्यास त्याची तावडतोब चिकित्सा करणे प्राप्त होते.

" बलवन्तं उपद्रवं तूर्णं चिकित्सेत् ।

उदराचे उपद्रव म्हणून छर्दि, अतिसार, तमक, तृष्णा, श्वास, कास, हिक्का, दौर्बल्य, पार्श्वशूल, अरुचि, स्वरभेद, मूत्रसंगादय: तथाविधं अचिकित्स्यं विद्यात् [ व. चि. १२ ]

वरील पैकी उदर संप्राप्तीतील प्राणदुष्टीने छर्दि, तृष्णा, श्वास, कास, हिक्का - अग्निदुष्टीने अरुचि - अपानदुष्टीने अतिसार, मूत्रसंग ही उपद्रवचिन्हें निर्माण होतात.

तसेच जलोदरामध्यें अतिसार होणे, पोटांतील पाणी शरीराचें दुसरे कोणतेही भागांत जाऊन संचित होणे, वृषणांत पाणी होऊन ते मोठी होणे, त्वचेखाली पाणी जाऊन तेथे भाजल्यासारखा फोड येऊन त्यातून पाणी वाहणे. [ अपक्लिन्नतनुत्वचम् ] वगैरे विकार हे जलोदराचे उपद्रव होत. जलोदर वगैरे साध्यासाध्यत्व - [ वातादिंचे ]

वातात्पित्तात् कफात् प्लीन्ह: सन्निपातात् तथोदकात् ।
परं परं कृच्छ्रतरं उदरं भिषगादिशेत् । व. चि. १३.

वातज उदरापेक्षा पित्तज व पित्तजापेक्षा कफज, त्यापेक्षा सन्निपातज दकोदर, उत्तरोत्तर कृच्छ्रसाध्य म्हणून वर्णिली आहेत.

तेष्वसाध्यं बध्दगुदं परिस्रावी च . शेषवशिष्टानि कृच्छ्रसाध्यानि
सर्वाण्येव प्रत्याख्यायोपक्रमेत् , तेषु आद्य: चतुवर्ग: भेषजसाध्य: ।

सुश्रुत.

बध्दगुदोदर व परिस्रावी [ छिद्र छिद्रोदर ] असाध्य आहे. इतर सहा कृच्छ्रसाध्य म्हणून त्यावर चिकित्सा करावी. वात, पित्त, कफ, प्लीह ही भेषजसाध्य उदरे आहेत.

अन्ते सलिलभावं हि भजन्ते जठराणि तु ।
सर्वाण्येव परिपाकात् तदा तानि विवर्जयेत । सु.नि. ८-२५

जातोदकावस्था आल्यानंतर सर्वच उदरे असाध्यतेप्रत जातात.

वातोदरांत वात व कफ यांची दुष्टि असते. पित्तोदरांत वात, कफ आणि पित्त यांची दुष्टी असते. यामुळे वातोदरापेक्षा तिन्हीं दोषांची दुष्टी असल्यामुळे पित्तोदर कष्टसाध्य झाले आहे. कफज उदरांत कफामुळे वायु स्त्रोतसात आवृत्त होतो, म्हणजे प्राधान्याने कफ आणि वायु हे दोन दोष असतात. म्हणजे कफोदरापेक्षांहि पित्तोदर कष्टसाध्यतम् आहे. कारण यांत तिन्हीं दोषांची विकृति असते. अत्यंत महत्वाच्या अशा कायाग्नीची पित्तोदरांत सर्वात् अधिक विकृति असते. " कायाग्निदेव बलवान् रक्षान् रक्षति जीवितम् " - तोच या ठिकाणी अत्यंत हतबल झालेला असतो. म्हणून पित्तोदर कष्टसाध्यतम आहे. व्यवहारात देखील असाच अनुभव येतो.

कफज उदर व्याधित रंजकपित्ताची क्षीणता सुचविणारा लक्षणसमुच्चय लक्षात घेणे आवश्यक आहे. पाण्डुरोगाच्या लक्षणसमुच्चयाशी ही लक्षणे ताडून पहावीत. कफज उदरांत पाण्डूचा अनुबंध असतो हे आचार्यांच्याहि लक्षांत

आलेले आहे. त्याशिवाय त्या उदरप्रकारात त्यांनी लोहकल्प आणि अयस्कति वापरली नसती. [ जयेत अरिष्ट गोमूत्राचूर्णायस्कृतिपानत: सक्षार तैल प्रानैश्च दुर्बलस्य कफोदरम् ॥ ] वा. चि. १५-७४.

कफज उदरांत वात व कफ यांचे प्राधान्य असते व पित्त क्षीण असतें. म्हणजे त्रिदोषज उदर असले तरी वातकफप्रधान असे कफोदर आहे. यात कोणतेच मर्म संपूर्णत: विकृत झालेले नसते. दीपक, पाचक, स्त्रोतोरोधनाशक अशी चिकित्सा, वातानुलोमन करण्याला व कफाचे अधिक्य घटविण्याला सारखीच उपयुक्त आहे. रंजकपित्ताच्या क्षीणतेची आपणांस आजच्या युगात यशस्वी चिकित्सा करता येते. जलपान वर्ज, लंघन, तीव्र विरेचन या क्रीया कफजउदरव्याधीचा रुग्ण चांगल्या त-हेनें सहन करु शकतो. त्यामानानें पित्तज वा वातज उदरव्याधीत तो सहन करु शकत नाहीं, म्हणून कफजउदर वातज व पित्तज उदरांपेक्षा अधिक सुलभतेनें चिकित्सितां येते.

वातज व पित्तजांत तुलना केल्यास पित्तजापेक्षा वातज उदर चिकित्सणें सोपे आहे. दोषांचा विचार केल्यास कफज उदराप्रमाणेंच वातज उदरांत पित्ताची उत्तान दृष्टी नसतें, तर पित्तज उदरांत वात, पित्त आणि कफ यांची [ तिघांची ] दुष्टी असतें. वातज उदरांत अग्निदुष्टी चिकित्सिणें सोपे असते. अग्नी प्रदिप्त करणें सुलभ जातें, अग्निस्वरुप पित्त स्वस्थानींच असते, उलट पित्तज उदरांत पित्त शाखाश्रित झालेले असते. इतके कीं, प्रसंगी रक्तस्त्रावही सुरु होतो.

संतर्पक औषधें वातज उदरांत वापरतां येतात. परंतु पित्तज उदरांत दुधासारखें लघुपण संतर्पक अन्न देखील नीट पचत नाहीं, म्हणून पित्तज उदर वातजापेक्षा कष्टसाध्य आहे. चरकांनी असाध्यता निदर्शक जे उपद्रव सांगितले आहेत ते उदरी रोग्यास प्राणघातक होतात. उदरांतील पाणी कमी करण्यासाठी " तीव्र विरेचयेत् " याप्रमाणें तीव्र विरेचनें दिली असतां त्यामुळें उदरातील पाणी कमी होण्यास सहाय्यता होते.

विरेचन म्हणजे भेषजकृत अतिसारच होय.. उदरी रोग्याला अतिसार सुरु झाला तर त्याचे उदरांतील पाणी कमी होण्यास साहय्यता होईल असे नाही. असल्या उपद्रवभूत अतिसाराने पाणी कमी न होतां रोग्याचे बलक्षय मात्र होत जातो. येथे क्रियाव्याघात निर्माण होतो. अतिसार बंद केल्याने पोटांतील पाणी कमी होण्याला व्यत्यय येतो व अतिसार न थांबविल्यास बलक्षय क्षणाक्षणाला वाढत जातो. या त-हेने इतर उपद्रवाबद्दल सांगता येईल.

पक्षाद् बध्दगुदं तूर्ध्वं सर्वम् जातोदकंतथा ।
प्रायोभवत्यभावाय छिद्रान्त्रं चोदरं नृणाम् ।

सामान्यत: नुकतेच झालेले म्हणजे महिना पंधरा दिवसांतले उदर किंवा दोन तीन महिन्यांतले उदर साध्य होते. या कालापेक्षा अधिक काल लोटल्यावर ते असाध्यतेप्रत जाउ लागते.

छिद्रोदर बध्दोदराचे आशुंकारित्व -

बध्दोदर व छिद्रोदर यामध्ये मात्र बारा तासांच्या आंतच उपचार झाले तरच साध्य, नाहीं तर मरण निश्चित असते. मुखाने विटगंधी छर्दि होऊ लागली कार्श्य व आनाह अति वाढले कीं, बध्दोदर मारकच व छिद्रोदरात तृष्णा अतिशय लागते, डोके खोलखोल जाते, मूर्च्छा आली की व नाडी अत्यंत क्षीण व दुर्बल होत होत हातपाय गार पडू लागले. घाम फार सुटूं लागला कीं, मृतावस्था अत्यंत सन्निधच समजावी.

यकृतोदरांत वामला निर्माण झाली [ व ] प्लीहोदर व यकृतोदर नाभी पर्यंत येउन अतिशय कठीण झाले, किंवा अर्बुदाची लक्षणे दिसली तर उदरी अनुपक्रम्यच समजावा.

जलोदरामध्यें जलविस्त्रावण करुन जल, पुन: पुन: भरत असेल तर आशा नाही. पार्श्वभंगान्नविद्वेष शोथातिसारपीडितम् । विरिक्तं चाप्युदरिणं पूर्यमाणं विवर्जयेत् । सु.सू. ३३ [ केव्हा केव्हा उदरामध्यें त्वचेखाली आंत्रांना लागूनच जो कोष्ठ आहे त्याच्या वरच्या भागात पाणी जमते. त्यावेळी नाभीच्या बाजूचे पोट फार मोठे होत नाही. खालच्या बाजूला कोष्ठाचा संकोच झाल्यामुळे खाली पाणी कमी असते. अशावेळी रोग्याला पार्श्वभंग हे लक्षण होते. त्यामुळे रुग्णाला कुशीवर वळता येत नाही व बसतांहि येत नाही. हे लक्षण झाले असता रोगी बरा होणे कठीण असते.

जलोदरामध्यें जलविस्त्रावण करुन जल पुन: पुन: असेल तर आशा नाही. पार्श्वभंगान्नविद्वेष शोथातिसारपीडितम् । विरिक्तं चाप्युदरिणं पूर्यमाणं विवर्जयेत् । सु.सू. ३३, केव्हा केव्हा उदरामध्यें त्वचेखाली आंत्रांना लागूनच जो कोष्ठ आहे त्याच्या वरच्या भागांत पाणी जमते. त्यावेळी नाभीच्या बाजूचे पोट फार मोठे होत नाही. खालच्या बाजूला कोष्ठाचा संकोच झाल्यामुळे खाली पाणी कमी असते. अशावेळी रोग्याला हे लक्षण होते. त्यामुळे रुग्णाला कुशीवर वळतां येत नाही व बसतांहि येत नाही. हे लक्षण झाले असता रोगी बरा होणे कठीण असते.

<u>अन्नविद्वेष</u> :- अग्निमांद्य, उदरांत पुढेही अप्रवृत्तीच्या आत्यंतिक दृष्टीमुळे [ हे लक्षण ] वाढत्या प्रमाणात राहते. विरेचन देऊन दोष कमी करत असतां अशा तऱ्हेचे कमालीचे अग्निमांद्य असल्याकारणाने पोटांत काही जाऊ शकत नाही.. दिवसेंदिवस बलमांसक्षय वाढत जातो व रोगी असाध्यच होतो.

शोथ :- " जाठरान् शोथ एव च " उदरामध्यें तीव्र उपद्रव म्हणून शोथ होतो. क्वचित लक्षणारुप असलेली ही एकदेशीय सूज असते. उदा. मुख, पाद, उदर व हस्त, क्वचित् ती सर्वांगाला व्यापून टाकते. ज्याप्रमाणे उदरांत जलसंचिती होते. तद्वतच त्वचेखाली कुप्याप्रमाणे त्वचेत जल सांचून वरचेवर पाझरु लागते. अशा अवस्थेतील रुग्ण विरेचन देऊनच बरे होऊ शकतात.

अतिसारासंबंधी वर विवेचन केले आहेत.

यकृतोदरांत, प्लीहोदरांत व क्षतोदरांत एक ते तीन महिन्यांत " परिस्रवतपूर्णमार्ग " अशी उदराची अवस्था येतेच. तसेच दोषोदर व दूष्योदर कालांतराने जलोदरांत परिणत होतात. ती पाकज जलोदरे असाध्यच होत.

प्रथम विकार होऊन निर्माण झालेले जलोदर असाध्य -

प्रारंभी दीर्घकालीन विकारांनी निर्माण झालेल नवीन उदरहि असाध्यच आहे. पृथक केला जलोदर हा रोग दुसरे रक्त रोग प्रथम होऊन होतो. प्लीहा, अर्श, पाण्डुरोग, मधुमेह, क्षय संग्रहणी , मांसार्बुद [ हल्ली ज्याला कॅन्सर म्हणतात ] गुल्म, हृद्रोग इत्यादि रोगांच्या परिणामी जलोदर होते. ते असाध्य असते. जलोदरापूर्व होणारा हृदयाचा विकार दोन प्रकारचा असतो. एक हृदयाचा आकार मोठा होणे व दुसरा प्रकार हृदय वर हरकणे, आणखीही हृदय विकाराचे बरेच प्रकार होतात.

हृदयाचा आकार मोठा होऊन यकृत वाढून जलोदर झालेले अनेक रुग्ण रुग्णालयांत येतात. त्यापैकी काही बरे होतात. बाकीच्या क्षय, मांसार्बुद मधुमेह वगैरे विकारानंतर झालेले जलोदर बरे होत नाही.

उदर रोग साध्य आहे...पण...

बलिन: तदजातांबु यत्नसाध्यं नवोत्थितम ।

बल -- [ बलाधिष्ठानमारोग्यं आरोग्यार्थ: क्रियाक्रम: ] या वाग्भटोक्ति प्रमाणे व्याधीचा प्रतिकार करु शकणारे शरीराचे बल असा अर्थ करु. बाल वृद्ध ज्यांचे अपतर्पण झालेले आहे किंवा कुपोषण झालेले आहे.

तसेच दीर्घकालीन आजाराने ग्रस्त, अशा त-हेच्या व्यक्तीचे बल कमी असते. बलहीन व्यक्तीचे व्याधी चिकित्सेला कष्टसाध्य असतात. अष्ट महारोगहि " बलमांसपरीक्षयात् असाध्यतेप्रत गेले आहे त. यासाठी रोगी जितका बलशाली तितका त्याची व्याधी साध्य होत जाणार.

अजातांबु -- ज्या उदराची परिणति जलोदरांत झाली नाही किंवा अजातोदरकावस्थेत आहे ते साध्य आहे. अर्थात् कृच्छ्रसाध्य आहे.

दोषासंकराच्या मानाने साध्यासाध्यत्व ठरते. सान्निपातिक अवस्था एकदोषज विकृतीपेक्षा सापेक्षा कष्टसाध्य असते.

असाध्य म्हणून ठरविलेले शस्त्रकर्मापैकी उदरपाटण व सीवनकर्म करुन छिद्रोदर व बध्दगुदोदर साध्य होते. जलविस्त्रावण करुन जलोदरही नंतर भेषज चिकित्सेने साध्य होते.

तरुण मनुष्याचा सर्व त-हेचा औषधींना सहन करणार, मर्मस्थानावर न झालेला. हेतु पूर्वरुप रुप व उपद्रव अल्प असलेला. दृष्य, देश व ऋतु व प्रकृति दोषांना अतुल्य असणारा, ग्रह अनुकूल असलेला एकाच भागातील व नवीन रोग सुखसाध्य असतो.

याउलट हेतू - पूर्वरुप - रुप मध्यम बलाचे असतां गर्भिणी, बाल व वृध्द यांचे रोग कृच्छ्रसाध्य असतात. जे शस्त्र, क्षार, अग्नि कृत्याने साध्य ते कृच्छ्रसाध्य असतात. चतुष्पादि संपत्ति नसलेले द्विमार्गातील द्विदोषज रोग कृच्छ्रसाध्य असतात. भिषक् द्रव्य उपस्थाता रोगी हे चिकित्सेचे पादचतुष्टय संपन्न असतां रुग्ण जर पथ्य पाळणारा नसेल तरीही रोग कृच्छ्रसाध्य होतो. उदा.- उदरांत दुधावरच राहणे, निदान ताकावर राहणे, जलपान वर्ज करणे पथ्य आवश्यक आहेत.

श्वयथु: सर्वमर्मोत्थ: श्वासो हिक्काऽरुचि: सतृट्
मूर्च्छा छर्दिरतीसारो निहन्त्युदरिणं नरम्

वर वश्वयुथु, मर्माच्या ठिकाणी श्वास, हिक्का, अरुचि, तृष्णा, मूर्च्छा छर्दि, अतिसार हे उपद्रव उदरी रुग्णाचा नाश करतात. वरील उपद्रवात वाताचा प्रकोप होत असल्याने त्याच्या चलगुणामुळे आशुकारित्व येऊन असाध्यता प्राप्त होते.

उदरातील रिष्ट :- "नियतमरणाख्यापकं लिंग रिष्टम" अशी माधवनिदान कारांनी रिष्टाची व्याख्या केलेली आहे.

विण्मूत्रसंग्रहश्वास शोफहिध्माज्वरभ्रम:
मूर्च्छा छर्यतिसारैश्च जठरं हन्ति दुर्बलम् ।
शूनाक्षं कुटिलोपस्थं उपक्लिन्न तनुत्वचम ।
विरेचनह्रतानाहं आनहन्त पुन: पुन: ॥ वा. शा. ५/८९, ९०

वरीलपैकी भ्रम, मूर्च्छा व बेसावधपणा हे रिष्ट पुष्कळ रुग्णांत पहावयास मिळते. शूनाक्षत्व व उदरातील पाणी संचित झाल्यावर पुष्कळ वेळा कुटिलोपस्थत्व हे चिन्ह एकदमच पहावयास मिळते.

तृष्णा :-उपद्रव ज्याप्रमाणे लक्षणारूप म्हणून तृष्णा दिसून आली तद्वतच उपद्रवरूप तृष्णेचा उपद्रव म्हणून उदरी रुग्णांत अनुभव आला. त्यावेळी प्रलाप भ्रम इत्यादी लक्षणासमवेत तृष्णा असे.

-----------